शुक्रवार दि.९ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# बांगलादेशात अडकले महाराष्ट्रातील विद्यार्थी:मायदेशी आणण्यासाठी शिंदेंकडून तातडीने हलचाली

## परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांच्याशी चर्चा



लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशमध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून हिंसाचार उसळलेला आहे. यावरून शेख हसीना यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा देत देश सोडण्याची वेळ आली. मात्र आंदोलकांकडून अनेक ठिकाणी दगडफेक, जाळपोळ केली जात आहे. त्यामुळे बांगलादेशात असलेल्या भारतीयांच्याही जीवाला धोका निर्माण झाला आहे. या हिंसाचारात महाराष्ट्रातीलही काही विद्यार्थी आणि कामानिमित्त गेलेले नागरिक अडकले आहेत. त्यांना मायदेशी परत आणण्यासाठी प्रक्तकेले जात आहेत. त्याचसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केल्याची माहिती आहे.

मुख्यमंत्री कार्यालयातून यासंदर्भात ट्विट करत माहिती देण्यात आली आहे. त्यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हंटले आहे की, ''बांगलादेशात अडकलेले राज्यातील विद्यार्थी, अभियंते आणि इतरांना मदत करण्यासह त्यांना मायदेशात परत आणण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री शिंदे यांनी आज परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या सुटकेसाठी सर्व उपाययोजना करण्यात येतील, यासाठी विशेष विमानांची व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन एस. जयशंकर यांच्याकडून देण्यात आलेले आहे.

दरम्यान, पुढे असे म्हंटले आहे की, ''बांगलादेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसह अभियंते आणि इतरांची त्यांच्या लोकेशनसह माहिती परराष्ट्र मंत्रालयाला देण्यात आली आहे. त्यांना तातडीने मायदेशात परत आणण्यासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी महत्त्वाची पावले उचलली आहेत''. बांगलादेशातील देशवासीयांना परत आणण्याच्या कार्यवाहीसाठी परराष्ट्र मंत्रालयात सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिली आहे.

दरम्यान, बुधवारी भारत-बांगलादेश सीमेजवळ घुसखोरी करणाऱ्या सुमारे ५०० बांगलादेशींना इडत्रच्या जवानांनी जलपाईगुडीजवळ रोखले. उत्तर बंगाल फ्रंटियरच्या म्हणण्यानुसार, बांगलादेशातील आंदोलकांच्या हल्ल्याच्या भीतीने हे लोक जमले होते. बीएसएफ आणि बॉर्डर गार्ड बांगलादेशने या लोकांशी चर्चा केली, त्यानंतर ते सर्व परतले. बांगलादेशला लागून असलेल्या आंतरराष्ट्रीय सीमेवर बीएसएफ हाय अलर्टवर आहे. तर शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर बांगलादेशात आज अंतरिम सरकार स्थापन होणार आहे. या १५ सदस्यीय सरकारचे नेतृत्व नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस करणार आहेत.

### खासदार मुकुल वासनिक यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी

# प्रदेश सोशल फोरमचे प्रदेश अध्यक्ष साहेबराव पाटोळे यांनी घेतली भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे



लोणार मेहकर मतदार संघ काँग्रेस पक्षाला सोडण्यात यावा यासाठी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे मा.जिल्हा सरचिटणीस तथा फोरमचे प्रदेश अध्यक्ष साहेबराव पाटोळे यांनी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे महासचिव तथा खासदार मुकुलजी वासनिक यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेऊन याबाबत सविस्तर चर्चा केली त्यांच्यासोबत बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विजयजी अंभोरे, व एन. एस. यु आय जिल्हा अध्यक्ष शैलेश खेडकर, डॉक्टर निलेश गावंडे, सत्यजित भुसारी, अशोक पडघान, यांनी साहेबां सोबत मेहकर विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षासाठी सोडण्यात यावे यासाठी सविस्तर चर्चा करून लोणार मेहकर विधानसभा मतदारसंघची उमेदारी साहेबराव पाटोळे यांना द्यावी अशी मागणी करण्यात आली साहेबांना उमेदवारी फाईल देण्यात आली त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले व पक्ष निरीक्षक नाना गावंडे, यांना गांधी भवन कार्यालयामध्ये भेट घेऊन लोणार मेहकर विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाला सोडून साहेबराव पाटोळे यांना उमेदावरी देण्यात यावे यासाठी त्यांचा सोबत सेवादलाचे प्रदेशचे नेते प्रकाश भाऊ धुमाळ, लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात, उपनगराध्यक्ष बादशाह खान, उपस्थित होते व यांच्या समक्ष व नानाभाऊ पटोले व नाना गावंडे यांना फाईल सादर करण्यात आले हाय सादर उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला

# चुंगीनाका ते हेडगेवार चौकापर्यंतच्या रस्त्यावर मुरुम टाकून खड्डे बुजवा-सिद्धार्थ

लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली । गौतम गावंडे



कुंडलवाडी शहरातील हेडगेवार चौक ते चुंगी नाक्यापर्यंतच्या रस्त्याची दयनीयअवस्था झाली असून या रस्त्याच्या कडेला के.रामलू पब्लिक स्कूल आणि डॉ.लखमपुरे दवाखाना असून या रस्त्याने सकाळी पालक आपल्या मुलांना शाळेमध्ये सोडण्यासाठी जात असताना आपला जीव मुठीत धरून गाडी चालवतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या रस्त्यावर जागोजागी मोठ मोठाले खड्डेच-खड्डे पडले असून या खड्ड्यांमुळे अनेक पालक आपल्या मुलांना शाळेत सोडायला गेले तेव्हा गाडी स्लीप होऊन खड्ड्यात गाडीसह पडल्याचे अनेक उदाहरण आहेत. त्यामुळे या संदर्भात कुंडलवाडी नगरपरिषद चे प्रभारी मुख्याधिकारी रघुनाथसिंह चौहान होते तेव्हा त्यांना या रस्त्या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते सिध्दार्थ कांबळे यांनी फोनवरुन माहिती दिली होती तरी सुद्धा या गंभीर प्रश्नाकडे कडे नगर परिषद प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना पहावयास मिळाले तर दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांना सुद्धा के.रामलू पब्लिक स्कूल,(डॉ.लखमपुरे दवाखाना) कडे जाणाऱ्या रस्त्या संदर्भात दोन वेळेस माहिती देऊन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांनी या रस्त्याकडे लक्ष देऊन खड्डेमय आलेला रस्ता मुरूम टाकून बुजविण्याचे काम करून घेताना दिसुन येत नसल्यामुळे या रस्त्यामुळे कुंडलवाडी शहरातील व परिसरातील नागरिकांना रहदारी करतेवेळी याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे . तर वाहन चालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे आता तरी नगर पालिका प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन खड्डेमय आलेला रस्ता मुरूम टाकून बुजविण्याचे काम करावे अन्यथा कुंडलवाडी नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीचे कुंडलवाडी शहराध्यक्ष सिध्दार्थ कांबळे यांच्या वतीने दि.१५ ऑगस्ट रोजी नगर परिषद समोर अमरण उपोषण करण्यात येईल याची दखल नगर परिषद प्रशासनाने घ्यावी अशा मागणीचे निवेदन मुख्याधिकारी यांना दिले आहे.

## इंद्रप्रस्थ कॉलनी येथे किष्किधाकांड भावार्थ रामायण ग्रंथ पारायण सुरू

लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रसंत श्री भगवान बाबा यांच्या जयंती निमित्त प्रतिवर्षी प्रमाणे या ही वर्षी दिनांक ०६/०८/२०२४ मंगळवार रोजी पासुन ते दिनांक-२४/०८/२०२४ शनिवार रोजी पर्यंत राष्ट्रसंत श्री भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान (मंदिर) इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे किष्किधाकांड भावार्थ रामायण या ग्रंथाचे रोज रात्री ८:०० ते १०:०० या वेळेत कथा भाग राहिलं या कथेचे वाचन/सुचक ह.भ.प. कचरू महाराज चव्हाण, ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे, ह.भ.प.उत्तम महाराज दोडके हे करीत आहेत. तरी या ग्रंथ कथेच्या श्रवणाचा लाभ परिसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा. असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक भाऊ - बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र सानप व परिसरातील भाविक भक्तांनी केले आहे.

# अंजनी गावात येणारा मुख्य रस्त्याची दयनीयअवस्था

## ग्रामपंचायतचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली । गौतम गावंडे



बिलोली तालुक्यातील मौजे अंजनी येथे गा गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याची सततच्या पावसामुळे रस्ता चिखलमय बनला आहे त्यामुळे गावात गावात जाणाऱ्या गावातील नागरिकांना व शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना काटे वरची कसरत करून चिखला मधून बाहेर निघावे लागत आहे ग्रामसेवक हळदेवा साहेब यांना दैनिक लोकनेता प्रतिनिधीनी संपर्क साधला असता गावातील दोन-तीन दिवसात त्या ठिकाणी मुरूम टाकू असे आश्वासन दिले होते मात्र आठ दिवस उलटून गेले तरीही त्या ठिकाणी मुरूम टाकले नाही ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे गावातील जेष्ठ नागरिक व विद्यार्थी व तसेच याच मुख्य रस्त्यावर महादेव मंदिर व विठ्ठल रुक्माई मंदिर , स्वस्त धान्य दुकान असल्यामुळे या ठिकाणी गावातील नागरिक व महिला या ठिकाणी मंदिराला येण्या जाण्यासाठी हेच मुख्य रस्ता असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तरी प्रशासन काय कार्यवाही करेल याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

> “ अंजनी गावातील मुख्य रस्त्या खराब झाल्याने दोन दिवसांत मुरुम टाकण्यात येईल असे आश्वासन दिले होते
> ग्रामसेवक,अविनाश हाळदेवाड

# सुकळी ज.गावात येणारा मुख्य रस्त्याची अवस्था रस्तो रस्ते खड्ड्याचा विकास

लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम राजा



तालुक्यातील सुकळी ज.येथे गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याची सततच्या पावसामुळे रस्ता चिखलमय बनला आहे त्यामुळे गावात जाणाऱ्या गावातील नागरिकांना व शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना काटे वरची कसरत करून चिखला मधून बाहेर निघावे लागत आहे ग्रामसेवक ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे गावातील जेष्ठ नागरिक व विद्यार्थी व तसेच याच मुख्य रस्त्यावर हनुमान मंदिर व विठ्ठल रुक्माई मंदिर , स्वस्त धान्य दुकान जागीरदार किराणा दुकान गावातील इमाम अहमद रजा चौक असल्यामुळे या ठिकाणी गावातील नागरिक व महिला या ठिकाणी मंदिराला येण्या जाण्यासाठी हेच मुख्य रस्ता असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तरी प्रशासन काय कार्यवाही करेल याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# महापालिकेच्या सौजन्याने ५ टक्के राखीव निधीतून दिव्यांग दांपत्याने उभारला स्वयंरोजगार,मनपा प्रशासनाचे मानले आभार

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सौजन्याने नांदेड शहरातील सोमेश कॉलणी परीसरातील दिव्यांग दांपत्य श्री व सौ विद्या शिवाजी सुर्यवंशी या दिव्यांग दांपत्याला दोन अपत्य असुन गत अनेक वर्षांपासून सोमेश कॉलणी परीसरात किरायाच्या घरात ते आपला व आपल्या परीवाराचा उदरनिर्वाह भागवत आपल्या दोन्ही मुलांच्या संगोपन करतात.बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड या संघटनेचा जिल्हा उपाध्यक्ष म्हणून शिवाजी सुर्यवंशी यांनी दिव्यांग नेते राहुल साळवे यांच्यासोबत गत २०१० पासुन काम सुरू केले.महापालिकेकडील दिव्यांगांचा राखिव निधी खर्च व्हावा यासाठी गत २०१५ पासुन विविध आक्रमक आंदोलने उपोषणे आणि मोर्चे काढले आणि शासन निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली.दिव्यांगांच्या या आंदोलन व मोर्चाची दखल घेऊन २०१६-२०१७ मध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी महापालिका महापौर उपमहापौर निवडी दरम्यान एक महत्वपुर्ण बैठक आयोजित करून दिव्यांगांच्या राखिव निधी खर्चास सुरूवात करून दिली तो निधी खर्च करण्यास सुरुवात झाली होती. त्यानंतर बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीतीच्या माध्यमातून हक्काच्या घरकुलासाठी दिव्यांगांनी तिवृ लढा उभारला त्यानंतर महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील प्रथम महानगरपालिका ज्यांनी दिव्यांगांना मोफत घरकूल देणारी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हि ठरली तर कोरोना महामारीच्या काळात उपासमारी होऊ नये यासाठी नांदेड शहरातील शेकडो दिव्यांगांना दरमहा आर्थिक मदत देणारीही महापालिका नांदेड हि एकमेव महापालिका ठरली आहे. स्वतः दिव्यांग असुन गत अनेक वर्षांपासून निस्वार्थ लढा लढणा-या दिव्यांग दांपत्य श्री व सौ विद्या शिवाजी सुर्यवंशी यांनी महापालिकेकडून नुकतेच स्वयंरोजगारासाठी देण्यात आलेल्या ५ टक्के राखीव निधितून आत्मनिर्भरतेचे प्रतिक म्हणून समाजापुढे एक आदर्श घडविला आहे एरवी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन बेरोजगारी वाढविणा-यांसाठी सुर्यवंशी यांनी एक जिवंत उदाहरण म्हणून महानगरपालिका नांदेड समोर श्री साई दिव्यांग बेरोजगार टि स्टॉल हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सौजन्याने आज उभारला आहे उद्या शुक्रवार दिनांक ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनी शेकडो दिव्यांगांच्या हस्ते या टि स्टॉलचे अधिकृत उद्घाटन होणार आहे तर दिव्यांग दांपत्य श्री व सौ विद्या शिवाजी सुर्यवंशी यांनी आम्हाला आत्मनिर्भर करून दिल्याबद्दल मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे.अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम.दिव्यांग विभागाचे सहाय्यक आयुक्त सुधीर इंगोले यासह महापालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत.




## चारोळी

पंचमीचा सण येता
आठव जागा होई
मग धावत मन कसे
माहेरच्या वाटेवरी जाई.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# गावाकडची नागपंचमी

सहज ऑगस्ट महिन्याचे कॅलेंडर चाळत होतो.पानावर मस्तीत झोके खेळणाऱ्या लेकरांचा फोटो पहिला आणि या महिन्यात नागपंचमी आहे लक्षात आले. चित्रे माणसांच्या अनेक आठवणी ताज्या करून जातात. झोके खेळणाऱ्या लेकरांचा फोटो पाहिल्याबरोबर मन शांत झाले. गावाकडील तीस-पस्तीस वर्षापूर्वीच्या नागपंचमीच्या अनेक आठवणींचा पट चित्रपटासारखा सर्रकन डोळ्यासमोरून निघून गेला. बघता बघता आपण लहान निरागस लेकराचे प्रौढ झालो! किती मोठा काळ लोटलाय? जीवनात काय काय घडलंय? किती चढ-उतार? मागे वळून पाहतांना थक्क झाले! असो, समुद्राच्या लाटा आणि घडीचा काटा कधी का कुणासाठी थांबलाय?

आमचं गोजेगाव म्हणजे जिथे चहुबाजूंनी निसर्ग मनमुराद उधळण करत असतो. उन्हाळ्यातील चार-पाच महिने सोडले तर बाकीचे सात आठ महिने गाव सुंदर निसर्गाने अक्षरशः नटलेल्या नवरीसारखा बहरलेला असतो. उत्तर आणि पश्चिमेला डोंगररांगांनी वेढलेले माझे गाव मला नेहमीच एक सुंदर पर्यटन स्थळ वाटते. पश्चिमेकडील छोटासा तलाव, त्याच्यापलीकडे पुन्हा डोंगर रांगा! एकदम भारी. माझा गाव मला प्रचंड आवडतो! प्रत्येक गावाची एक परंपरा असते. गावातील विविध कार्यक्रम आणि सण-समारंभ गावचा जिवंतपणा!

प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर
महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

आखाडी अन् चाऱ्ही सण हाकारी असं माय सहज बोलायची. आषाढ महिन्यातील पौर्णिमा म्हणजेच गुरूपौर्णिमेने गावाकडचे सण सुरु होतात. त्यानंतर श्रावण येतो. श्रावणात पाउस मनसोक्त बरसतो. धरती हिरवा शालू नेसून नव्या नवरीसारखी नटून थटून मिरवत असते. डोंगर फुलतात, झाडे डुलतात. पक्षी छान छान गाणी गातात. डोंगर रांगातून मोरांचे मस्त मधुर म्याव म्याव आवाज येतात. असं वाटतं, पळूपळू जावं आणि त्या म्यावला अलगद पकडून घरी आणावं! वेडं मन! पंचमीला खूपच मज्जा यायची. पाचवीपासून मला सगळं आठवतंय. सहावी-सातवीपासून रविवारी आणि वावरात सुधाकरदादाला नेटाचे काम असले कि मला गाई चारायला जावे लागत असे. ती एक वेगळीच मज्जा आणि कधी कधी सजा पण. गावाकडचा पंचमीचा सण लय भारी. आठ आठ दिवसाची झड. गोठ्यात ढोरं, बाहेर ठाक पाउस. थोडा वेळ गाईंना बाहेर काढायचे, पटकन गोठा साफ करायचा आणि लगेच गाई मध्ये. कडब्याच्या वळहिच्या पेंढ्या निघता निघत नसायच्या. ओढून काढताना कडब्याने हात कापायचे. सगळं झालं कि; मग पंचमीची तयारी. गावात सर्वात मोठा झोका खंडू जायभायाच्या पोऱ्हायचाच झोके खेळणारे माणसं-बाया अशी चर्चा करायचे. आपला झोका सगळ्यात मोठा याचं अप्रूप वाटायचं, पण लहान असल्यामुळे मोठा झोका खेळता येत नसे. आमच्या झोक्याची तयारी उन्हाळ्यातच व्हायची. आम्ही सात भाऊ, पण नामादादा, मुरलीदादा, सुधाकरदादा अन् मी असे चौघं भाऊ मस्त दोस्त होतो आणि आजही आहोत! दादा झोक्याची जागा जितून वडाच्या झाडावर जाऊन तिथं रकटं (फाटकं पोतं) घट्ट बांधायचा. अधूनमधून आम्ही त्यावर लक्ष ठेवायचो.



मला अजून पक्कं आठवतय. त्यावर्षी जोरात झड सुरु होती. गाई-बैलांना सोडणे अशक्य . झोक्याची जागा पक्की होती, पण दोरी नव्हती. काय करायचे? ठाक पावसात पहाटे पहाटे तीन वाजता सुदादादा आणि मुरलीदादाने वावरातून मोटंचा सौंदर आणला. पडत्या पावसात चार वाजता वडाच्या उंच फांदीला झोका बांधला. अंगावर पोत्याचे घोंगते होते. आम्ही सगळे भिजलो पण झोका बांधलाच! गावाच्या उत्तरेला एक जुनं मोठं वडाचं झाड आहे. पंचमीच्या काळात चार-पाच दिवस त्या वडाला लहान मोठे शंभर-सव्वाशे झोके असायचे. सगळीकडे गोंधळ-गोंगाट. रडारडी, हाणामारी, ठोकाठोकी, भांडणच भांडणं! लेकुरवाळ्या डुकरीणीसारखा सगळा वड डूरडूरीने गजबजून जायचा. भाग्यवान बिचारा! वड मस्त हसायचा, लेकरांना झोके खेळतांना पाहून तोही झोके घ्यायचा! झोका व्हायचा वड! आम्ही तिथेच झोके खेळून, पडून, उठून, चिखलात भरून, भांडणे करून लहानाचे मोठे झालो. आजही तो वड तिथे जिवंत आहे, मात्र आता वस्तीने अक्षरशः त्याच्या गळ्याला फास लावून आवळून टाकले आहे. पंचमीच्या दुपारी पारावर भजन सुरु व्हायचे. आमचे बाबा मृदंग घेऊन पारावर जायचे. किसनराव सांगळे मामा, लोडबाराव सांगळे मामा, विठोबा कांदे मामा, पंडितराव सांगळे मामा, किसन जायभाये तात्या, पांडुरंग सांगळे मामा, नागोराव नागरे (पाटील) मामा अशी जुनी जाणती मंडळी पारावर भजनासाठी जमायची. यांच्या जोडीला नाजूकदा, नामादादा, उत्तमदा, मारोती, गणा, आम्ही नव्या थडीची भजनी मंडळी भजनात बसायचो. मी हि टाळ घ्यायचो. वाजवतांना टाळ मागं-पुढ व्हायचा. सगळे माझ्याकडं पहायचे. मृदंग वाजवतांना बाबा, ये, टाळ नीट वाजेव नाही तर ठुउन दे. नुसत्या टाळ्या वाजव असं बोलायचे. मला धस्स व्हायचं. मग मी थोडा वेळ थांबायचो अन् लगवीच्या निमित्ताने भजनातून झोक्याकडे हळूच निघून जायचो. पाराच्या मागे, शाळेच्या समोर दोन मोठमोठे लिंब होते. त्या दोन्ही झाडांना मोठाले झोके असायचे. तेंव्हा वर नेमकीच झोपडपट्टी झाली होती. तिकडे लोकांची वर्दळ नव्हती. चारदोन लोकांचे गाई-बैल बांधण्यासाठीचे गोठे होते. इकडे पारावर भजन तर तिकडे झोपडपट्टीवर झोपड्यात अनेक माणसे घोळक्याने बसलेले दिसायचे. तरुण, मधल्या वयाचे आणि काही वयस्कर माणसंही पत्ते खेळायचे. तिथं जायची सुद्धा आम्हाला भीती वाटायची. एकदा मोठ्या दादाने पत्त्याच्या डावाजवळ उभं असतांना पाहिलं आणि खनकन दोन कानफटीत! पत्त्याच्या डावाजवळ जाणे कायमचे बंद!


घरी माय-भाबींची स्वयंपाकाची गडबड. पोतरलेल्या भिंतीवर माय बोटानं नागोबा काढायची. तिथं पिवळा दोरा गुळानं चिकटवायची अन् दुसऱ्या दिवशी तोच दोरा पवत्यापुनवपर्यंत आमच्या हाताला बांधायची. माय अधल्यादिवशीच ज्वारीच्या लाह्या करून ठेवायची. तापलेल्या काढईत ज्वारीचे दाने टाकले कि तडतड वाजून तरतर फुगून त्याच्या मस्त लाह्या व्हायच्या. तिकडे नव्यानव्या माहेरवाशिणी झोके खेळतांना, अगं माय पंचमीची लाही, अन् पोळ्यान केली घाई असं गाणं म्हणत जू जू, सू सू करत दोघीदोघी झोके खेळायच्या. सगळं वातावरण नटून, थटून, सजून जायचं! पुरणपोळी, पण आज भात नाही. पंचमीच्या दिवशी तांदूळ खाऊ नय. ते नागोबाचे दात असतात असं माय सांगायची. सोबत पुरण घालून शिजवलेल्या कानवाट्या! आजही कानवाट्या मला फार आवडतात. त्यांतर पाच वाजता वारुळाला दिंडी जायची. मसनवट्याच्या पलीकडून एक वारूळ होते. तिथे दिंडी जायची. सगळा गाव तिथे कानवाटीचा निवद वाहायचा. दिंडी परतली कि पारासमोर मस्त फुगड्या, सोंगं, भारुडं, गवळणी रंगायच्या! सगळा गाव तिथं जमायचा. लोकांचे जिवंत मनोरंजन व्हायचे. अंधार पडला कि जय विठ्ठल! भजन थांबायचे. जातांना घरून आणलेला लाह्याचा प्रसाद वाटप व्हायचा आणि सर्व आपआपल्या घरी पुरणपोळी, कानवाट्या खायला निघून जायचे. दुसऱ्या दिवशी शिराळाची गाणी!

मित्रहो, पंचमी म्हणजे श्रावणातील पाचवा दिवस. वार्षिक उत्सवाची सुरुवात! कृषीजणांच्या संस्कृतीने, निसर्गपूजनाने नटलेले सण खूप काही शिकवतात. गावातील सण-उत्सव माणसामध्ये सहनशीलता, एकोपा, प्रेम, जिव्हाळा, कलात्मकता इत्यादी मुल्ये रुजविण्याचे महत्कार्य करतात. नागपंचमी आजही आठवणीचे पोतडे खुले करते. माय-बाबा-दादा-गाव हृदयाच्या खोल कप्प्यात तसंच घर करून जिवंत आहे.

# स्पर्धा परीक्षा किंवा इतर खासगी कोचिंग क्लासेस मुळात हवेतच कशाला?

लोकनेता न्यूज नेटवर्क

आपल्याकडे तरुणांचा देश म्हणून ओरड सुरू आहे मात्र , तोच तरुण सध्या कोणत्या अवस्थेतून जात आहे याचे मात्र कुणालाच काही देणे घेणे नाही. एकीकडे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांच्या वयाचा वाढत असलेला नंबर तर दुसरीकडे वर्षानुवर्ष स्पर्धा परीक्षा क्लासेसचे संचालक होतायत गब्बर . देश तरुण म्हणून आपण कुठपर्यंत घोकणार आहोत?की, त्यांच्यासाठी काही करणार आहोत? याचा कुठलाच आराखडा सरकारकडे दिसून येत नाही. विविध विभागात शेकडो जागा रिक्त असताना त्या न भरता खासगी पद्धतीने भरून तरुणांची चेष्टा केली जात आहे. नुकत्याच दिल्लीतील घटनेने क्लासेस सेंटरची विद्यार्थ्यांसाठी केलेली व्यवस्था चव्हाट्यावर आली आहे. अलीकडील घटनेने देशाच्या नोकरशाहीत आपले स्थान मिळविण्याच्या आशेने या परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांना सोसाव्या लागणाऱ्या आर्थिक आणि मानसिक त्रासांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. अशा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थी देशभरातून दूर-दूरवरून महानगरात येतात, तेथील निवासस्थानाच्या शोषणात्मक पद्धतीमुळे प्रचंड मानसिक दबाव विद्यार्थ्यांसाठी जगण्याचा खेळ बनतो आहे.या दबावाला बळी पडून महाराष्ट्रातील एका विद्यार्थ्याने आत्महत्या करून मरण पावले, त्याच्या काही दिवसांपूर्वीच एका कोचिंग सेंटरच्या पूरग्रस्त तळघरात बुडून तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.दिल्लीतील मुसळधार पावसात त्यांच्या राजिंदर नगर कोचिंग सेंटरच्या पूरग्रस्त तळघरात अडकलेल्या तीन नागरी सेवा इच्छुकांच्या बुडून मृत्यू झाल्याची सर्वोच्च न्यायालयाला ५ ऑगस्ट रोजी स्वतःहून दखल घ्यावी लागली यावरून स्पर्धा परीक्षा क्लासेस तरुणांच्या जीवांशी किती खेळत आहेत याची प्रचिती येते.





स्पर्धा परीक्षा किंवा इतर खासगी कोचिंग क्लासेस मुळात हवेतच कशाला? असा प्रश्न पडला तर किंवा या प्रश्नाची कुणाला पुसटशी कल्पना सुध्दा नसेल की, क्लासेस शिवाय मुलं स्पर्धेत टिकतील याचीही कधी कल्पना केली नसेल. पण करून बघा.विचार केला तर गेल्या दहा- पंधरा वर्षांपूर्वी असे क्लासेस किती होते?तर होते हेच माहिती नसेल तेव्हा सुद्धा स्पर्धा परीक्षा होत्या आजही आहेत.पूर्वी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांची संख्या काही नगण्य असली तरी जागांची संख्या सुध्दा नगण्यच असायची. त्यामुळे यात काही किंचित तफावत असेल यात दुमत नाही.सध्याच्या घडीला स्पर्धा वाढली आहे हे कोणिही मान्य करेल पण स्पर्धा वाढली तशी जागाची संख्या सुध्दा वाढलेली दिसते तर अनेक क्षेत्रेही खुणावत आहेत.यात टिकायचे म्हणजे क्लासेस शिवाय टिकू शकत नाही.ही मानसिकता केवळ शहरांपुरती मर्यादित नाही तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुध्दा स्पर्धा करायची म्हटलं तर खासगी क्लासेस शिवाय पर्याय नाही ही हल्ली मानसिकता निर्माण करण्यात स्पर्धा परीक्षा क्लासेस सेंटरचाही हातभार म्हणावा लागेल.कारण, काही स्पर्धा परीक्षा चालवणारे खासगी क्लासेस सेंटर आपल्या जाहिरातीत असे ठासवतात की, जणू त्या विद्यार्थ्यांची काहीच मेहनत नाही.सगळं काही त्या सेंटरची किमया.या जाहिराती वर्तमानपत्रांची पानच्या पानं भरून येतात.त्यामुळे या जाहिराती पाहून विद्यार्थ्यांचा क्लासेसकडे ओढा वाढतो आणि त्याशिवाय स्पर्धा परीक्षेत यश नाही अशी मानसिकता निर्माण होते हे सर्रास वास्तव चित्र आहे. मग, त्यातून आजच्या स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षा चालवणाऱ्या खासगी क्लासेसमध्ये स्पर्धा लागली आहे. कोणत्या क्लासेसचे विद्यार्थी किती शासकीय पदांवर लागले?त्यातून क्लासेसचा व्यवसाय पाहिला तर ही सेवा की आर्थिक बाजार बनली आहे. एकीकडे दिवसेंदिवस क्लासेस सेंटरच्या माध्यमातून आर्थिक बाजार मांडला जातो तर दुसरीकडे मुलांसाठी पालकांचा आर्थिक बाजार उठतो. बरं यात शासकीय नौकरीला लागण्याचा टक्का किती तर अगदीच नगण्य. तर काही म्हणजे एखादं दुसरा विद्यार्थी कोणतेही क्लासेस न लावता यशस्वी होतो.जसे पंधरा -वीस वर्षांपूर्वी होते.मग, खासगी क्लासेस कशासाठी?हा प्रश्न पडतो.जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती काही तरी विशेष वेगळेपण घेऊन जन्म घेते.जो तो त्या -त्या परिने प्रयत्न करतात आणि यशस्वी होतात.स्पर्धा परिक्षेत किंवा जीवनाच्या परिक्षेत. त्यामुळे अनेक जण आपापली वाट चोखळतात. कोणी स्पर्धा परीक्षांची तयारी करतो तर कोणी खासगी क्लासेस लावतो.त्या क्लासमधील काही मोजकेच विद्यार्थी यशस्वी होतात.तर इतरांची तितकी गुणवत्ता नसेल काय?हा प्रश्न. असे अनेक प्रश्न उपस्थित होतात म्हणून खासगी क्लासेस कशासाठी? क्लासेसचा हा गोरखधंदा गावपातळीपर्यंत येऊन ठेपलाय. त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते. शहरात पावलापावलावर म्हटले तरी वावगे ठरू नये क्लासेस सेंटर आहेत.आजघडीला क्लासेस सम्राट लाखोंच्या चारचाकी गाड्यांमध्ये फिरतायत. ज्या शिक्षण क्षेत्रासाठी फुले दांपत्यानी जिवाची काड केली आणि इथल्या मातीत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.त्या शिक्षाणाचा बाजार खासगी क्लासेसवाल्यांनी रस्त्यावर आणाला आहे. सांगण्याचा मतलब म्हणजे दिल्लीतील एका क्लासेस सेंटरमध्ये पावसाचे पाणी शिरून दोन इच्छुक आयएएस विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.या सगळ्या प्रश्नांचं उत्तरं एकच आहे.त्याने प्रश्न उपस्थित होतो की, खासगी क्लासेस सेंटर कशासाठी? स्पर्धा परीक्षा सेंटरपेक्षा शालेय, माध्यमिक , उच्च माध्यमिक तसेच पदवी स्तरावर स्पर्धा परीक्षांची प्राथमिक माहिती दिली तर पुढे स्पर्धा परीक्षा देताना त्या प्राथमिक माहितीच्या आधारे विद्यार्थी अभ्यास करून स्पर्धेत उतरतील.त्यामुळे स्पर्धा परीक्षा क्लासेस वेगळे लावण्याची गरज पडणार नाही.त्यामुळे त्यावर बंदी घातली तर आणि शालेय स्तरावर प्राथमिक माहिती दिली तर याचा विचार करावा एवढेच.



पदमाकर उखळीकर,
मो.९३७५१८८९१२

# लोकशाही सक्षम करण्यासाठी मतदारांनी आपल्या नावाची मत दार यादीत नोंदणी करून घ्यावी

## उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेडराजा | ज्ञानेश्वर बुधवत

निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यावर्षीच्या दुसऱ्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाची सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघांमध्ये विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यात १ जुलै २०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण केलेल्या नव मतदारांची नोंदणी करणे लोकशाही बळकटीकरणासाठी नव मतदारांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन सिंदखेडराजा चे उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांनी केले आहे.



मा. भारत निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार २४ - सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघामध्ये १ जुलै, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यादीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम सुरु असून, सदर कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसुत्रिकरण अंतर्गत मतदार संघातर्गत ४ मतदान केंद्राची वाढ झालेली आहे त्यामध्ये देऊळगाव राजा तालुक्यातील अंभोरा व जांभोरा गाव हे एका मतदान केंद्रास जोडलेले होते व जांभोरा येथील मतदारांना मतदान करण्यासाठी ८ ते १० किमी अंतर जाऊन मतदान करावे लागत होते त्यामुळे जांभोरा येथे मतदान केंद्र करण्यात आले व सिंदखेड राजा तालुक्यात सिंदखेड राजा शहरात २ मतदान केंद्र व ग्रामीन मध्ये पांग्री उगले मध्ये १ मतदान केंद्र असे एकुण ४ मतदान केंद्राची वाढ करण्यात आलेले आहे व देऊळगाव राजा येथील १५ मतदान केंद्राच्या नावामध्ये बदल करण्यात आलेला आहे व एकुण मतदार संघात एकुण ३४० मतदान केंद्र तयार झालेली प्रारूप मतदार यादी दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४ रोजी २४ सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघातील सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, लोणार, चिखली तालुक्यातील सर्व मतदान केंद्रावर प्रारूप मतदार यादया प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर यादया संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व संबंधित तहसील कार्यालयामध्ये पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. तसेच मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांची वेबसाईट लशे.ारहरीरीहींीर.सीं.ळप या वेबसाईटवर सुध्दा उपलब्ध आहेत. तरी २४ सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघांतील मतदारांनी आपल्या नावाची तपासणी करुन प्रारुप मतदार यादीमध्ये आपले नाव असल्याची खात्री करुन घ्यावी.

सदर कार्यक्रमांतर्गत दिनांक ६ ऑगस्ट, २०२४ ते २० ऑगस्ट, २०२४ या कालावधीत दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत. या कालावधी दरम्यान दिनांक १० ऑगस्ट, २०२४ (शनिवार) व दिनांक ११ ऑगस्ट, २०२४ (रविवार) तसेच दिनांक १७ ऑगस्ट, २०२४ (शनिवार) व १८ ऑगस्ट, २०२४ (रविवार) या दिनांकास २४ सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघामध्ये मतदार नोंदणीबाबत विशेष मोहिमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या दिनांकास मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.) हे मतदान केंद्रावर उपस्थित राहून मतदार नोंदणीचे अर्ज स्विकारणार आहेत. मतदार नोंदणीसाठी पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र, आधारकार्ड, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, रहिवासी पुरावा व आपल्या जवळच्या नातेवाईकाचे मतदार ओळखपत्राची छायांकित प्रत आवश्यक आहे. तरी २४ सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघातील सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, लोणार, चिखली तालुक्यातील दिनांक ०१/०७/२०२४ रोजी ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहे. अशा सर्व पात्र नागरिकांनी लोकशाही सक्षम करण्यासाठी आपल्या नावाची मतदार यादीत नोंदणी करावी. असे आवाहन प्रा. संजय खडसे, उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा तथा मतदार नोंदणी अधिकारी, २४ सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघ तसेच श्री. प्रविण धानोरकर तहसिलदार सिंदखेड राजा व श्रीमती वैशाली डोंगरजाळ, तहसिलदार देऊळगाव राजा यांनी केले आहे.

**मतदार नोंदणी अधिकारी,**
**२४ - सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघ**

# ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिवस...

लोकनेता न्यूज नेटवर्क

'' अशिक्षित गरीब जरी असलो आम्ही
निर्सग देव आमच्या प्रत्येक मनी माणुसकीचे
जपतो नाते भेदभाव ना आमच्या ध्यानी ''

सर्व प्रथम माझ्या सर्व भारतीयांना आजच्या जागतिक आदिवासी दिनाच्या व क्रांती दिनाच्या मनपुर्वक शुभेच्छा...!!! मित्रांनो संयुक्त राष्ट्रसंघाने १९९४ ला घोषीत केल्यापासुन ०९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन म्हणुन संपुर्ण जगभरात साजरा केला जातो. आदिवासी नावाला फार प्राचीन ईतिहास आहे. आदिवासी म्हटले की आपल्या समोर डोंगर, दर्यात जंगलात राहणारा, उघडा, नागडा, असणारा ओबड धोबड चेहर्याचा व जगाशी कुठलाही संपर्क नसनारा समाज येतो. जगाच्या पाठीवर ज्या माणसाने ज्या जीवाने जन्म घेतला तो म्हणजे आदिवासी

आज जगाच्या पाठीवर ज्या काही कला अस्तित्वात आहेत त्या सगळ्या कलांचा उदगाता आदिवासी आहे. आदिवासींची लोककला, चित्रकला, नृत्य, गायन, वादन व शिल्पकला याला आजच्या विकसित व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अक्षरशा तोड नाही आदिवासी समाजाने खर्या अर्थाने स्वाता:च्या जीवाची पर्वा न करता जंगलाचे रक्षण करुन निर्सगाचा समतोल राखन्याचे मोलाचे काम केले आहे. आदिवासी समाजाची स्वातंत्र अशी जीवन शैली आहे. रुढी, पंरपरा आणि सामाजिक कायदे यांच्या आधारे स्वशासन अशी त्यांची वैशिष्ट्यपुर्ण समाजव्यवस्था अस्तित्वात होती. ईंग्रजाच्या काळा मध्ये त्यांचा जमीन व जंगलावरील हक्क हिरावला गेल्याने त्यांच्या स्वंयपुर्ण समाजव्यस्थेला तडा गेला आणि त्यांचे जीवन परावंलबी झाले. त्या मुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. गरीबी, अज्ञान, आरोग्य सुविधांचा अभाव, बेरोजगारी, मजुरी व अंधश्रद्धा अश्या अनेक समस्या त्यांच्या पुढे आवासुन उभ्या आहेत. मित्रांनो विकासाच्या प्रवाहापासुन कोसो दुर असणार्या आदिवासी समाजाला 'पेसा कायद्यामुळे विकासाच्या मुख्य प्रवाहात येन्याची संधी मिळत आहे. या समाजातुन स्पर्धा परिक्षा मधुन ही नैपुन्य दाखविनार्यांचा टक्का वाढला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही आदिवासी वीरांनी अनमोल असे योगदान दिले आहे.

क्रांतीकारक बाबुराव आडमोक, नारायणसिंह उईके, राघोजी भांगरे, बख्तबुलंदशाहा, दलपतशाहा, समसेरसिंग पारधी, ख्वाजा नाईक, तंट्या भिल, जननायक बिरसा मुंडा, यांचे योगदान अविस्मरनिय आहे. शेवटी मला फक्त एवढेच सांगावे वाटते '' नात माझ निर्सगाशी झाडे, वेली, पशुपक्षी सारे आहेत माझे मित्र खरे मंजुळ पावरी वाजे आम्ही आहोत जंगलाचे राजे सर्व समाज बांधवानी आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे विनम्र अवाहान करत आहे. व पुन:च्छ एकदा सर्व भारतीयांना जागतिक आदिवासी दिनाच्या मनपुर्वक शुभेच्छा...!!!

**-प्राचार्य माळी संतोष**

# उमरखेड तहसिल कार्यालयाचे स्थानांतर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड | सय्यद रहीम राजा

८ऑगस्ट २०२४ रोजी तहसिल कार्यालयाचे स्थानांतर होत असून पुसद रोडवरील हुतात्मा स्मारकाच्या बाजूला असलेली यू पी पी कॉलनीतील येथे असलेल्या इमारतीमध्ये तहसिल कार्यालयाचे स्थलांतर होत आहे. आज पासून तहसिल कार्यालय हे पुसद रोडवरील यू पी पी कॉलनी हुतात्मा स्मारक च्या जवळ पुसद रोड उमरखेड येथे स्थानांतर झाले आहे.

झाडे
लावा
झाडे जगवा



# सरकार माय बाप..! आष्टी तालुक्यातील काही रस्त्यांची लागली वाट? चिखल.. खड्ड्यांमुळे वाहतूक प्रवासी जिव मुठ्ठीत घेऊन चालतात...जरा यापण रस्त्याकडे लक्ष द्या... प्रवासी नागरिक हैराण अवस्थेत..!


## कोणत्याही रस्त्यांवरून गाडीत फिरा आणि खड्डे मोजा;लोणी सय्यदमिर येथील नागरिक त्रस्त..!

## राज्य सरकारने संपूर्ण राज्यातील रस्त्यांची जबाबदारी घेणारे स्वतंत्र प्राधिकरण निर्माण करण्याबाबत माहिती तथा सामाजिक कार्यकर्ते –श्री.बाबु भिमराज देवकर यांचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथ शिंदे साहेब यांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**







**सत्येघटने वर आधारित लोणी सय्यदमीर सह काही ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था...सरकार माय बाप..! आष्टी तालुक्यातील काही रस्त्यांची लागली वाट? चिखल..खड्ड्यांमुळे वाहतूक प्रवासी जिव मुठ्ठीत घेऊन चालतात...जरा यापण रस्त्याकडे लक्ष द्या... प्रवासी नागरिक हैराण अवस्थेत..!!अशी खंत माहिती अधिकार सामजिक कार्यकर्ते श्री.बाबु भिमराज देवकर यांनी मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे निवेदनाद्वारे जनहितार्थ केली आहे.**

काही करा रस्त्यावर एकही खड्डा राहता कामा नये खड्डे तात्काळ न बुजवल्यास व निकृष्ट दर्जाची कामे केल्यास कठोर कार्यवाही केली जाईल अशी ताकीद मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी आतापर्यंत यंत्रणेला दिली मात्र आजही लोणी सय्यदमीर परिसरात रस्त्यांवर खड्डे जैसे थे अशी परिस्थिती आहे.यंदा ही लोणी सय्यदमिर परिसरात पावसाळ्यात मोठ मोठे खड्डे पडले असून.काही ठिकाणी रस्त्यांची अक्षरशःचाळण झाली आहे.पाणी साचून रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले असून लोणी गावात खड्ड्यांमुळे रोडवरचा प्रवास धोकादायक बनला आहे.लोणी सय्यदमीर या ठिकाणी कायमच वाहनांची वर्दळ असते;शाळेतील मुलांना खड्डे टाळत प्रवास करावा लागतो.;वाहतुकीच्या दृष्टीने हा मार्ग महत्त्वाचा असून रोज मोठ्या संख्येने वाहने-जा करत असतात त्यामुळे हे खड्डे धोकादायक झाले असून शासनाने यावर विचार करणे गरजेचे आहे.या रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिक अक्षरशःत्रासले आहेत.देशात सर्वाधिक अपघात हे महाराष्ट्रात होतात त्यामध्ये जितके बळी जातात त्याचे साधारण अडीच पट नागरिक जखमी होतात त्यातले काही कायमचे अपंग होतात.हे सर्व अपघात रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होतात सर्वच ठिकाणी अपघात झाले तरी त्याचे मुख्य कारण हे रस्त्यातील खड्डे हे आहे.आपला मुलगा मुंबईतल्या खड्ड्यांमुळे मरण पावला हा पुत्रवियोग बाजूला ठेवून दादाराव भिलोरे हा सामान्य नागरिक इतर कोणावर अशी वेळ येऊ नये म्हणून ;खड्डे बुजवत सुटतो. शेकडो खड्डे बुजवतो.त्याला इतर अनेक संस्था मदत करतात.आणि अनेक समदुःखी लोक पुढे येतात.त्यात अपत्यशोकाची वेदना आणि ती बाजूला ठेवून हातात फावडे घमेले घेणारा बाप हे चित्र काळजात नेण्याइतकी संवेदना राजकीय पक्षांमध्ये उरलेले नाही.चांगले रस्ते हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे असे मुंबई उच्च न्यायालयाने २०१५ मध्ये म्हटले होते त्यानंतर सात वर्षांनी राज्यातील रस्त्यांच्या प्रश्नांवर स्वतंत्र खंडपीठ स्थापन करण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाला घ्यावा लागला आहे.केरळच्या उच्च न्यायालयाने जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत उत्तरदायी असेल असा निकाल दिला आहे? राज्य सरकारने स्वतंत्र रस्त्याची जबाबदारी घेणारी प्राधिकरण निर्माण करावी या प्राधिकरणाने ग्रामसडकांपासून ते महामार्गापर्यंत प्रत्येक रस्त्याच्या निगराणीची जबाबदारी घ्यावी. व खड्डे मुक्त महाराष्ट्र करावा. जलयुक्त शिवार ही राज्य सरकारची ग्रामीण भागातील लोकप्रिय योजना राबवण्याची यंत्रणेची इच्छा आहे की काय असा प्रश्न लोणी गावातील रस्त्यांना पाहून होतो. पावसाळ्याचे पाणी खड्ड्यात साचत असल्यामुळे अनेक अपघात होतात तसेच उंच व सखल रस्त्यांचा प्रवाशांना त्रास होतो.

---

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा लाभ सर्वांनी घ्यावा

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे राज्यात ३०१ कोटीचे तर नांदेड जिल्ह्यात ५.५ कोटीचे वितरण–रामहरी राऊत

**तसेच यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कराळे म्हणाले की, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा लाभ लोहा –, कंधार तालुक्यातील सर्व रुग्णांची घ्यावा तसेच या योजनेशी निगडित दवाखाने लोहा शहरात ही सुरु करावे तसेच कुण्या रुग्णांना काही अडचण असेल तर त्यांनी माझ्या लोहा येथील शिवसेनेच्या सिंहगड जनसंपर्क कार्यालयात संपर्क कार्यालयात संपर्क साधावा असे बाळासाहेब पाटील कराळे म्हणाले.**



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा लाभ सर्व गरजू रुग्णांनी घ्यावा मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत राज्यात आतापर्यंत ३०१ कोटी रुपयांचे तर नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत ५.५ कोटी रुपयांचे वितरण झाले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री सहाय्यता निधी मुख्यमंत्री कार्यालय मुंबई चे कक्ष प्रमुख तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख रामहरी राऊत यांनी लोहा येथे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कराळे यांच्या जनसंपर्क कार्यालयात पत्रकार परिषदेत केले.

यावेळी शिवसेना ( शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कराळे,, शिवसेना शहरप्रमुख सतीश आणेराव, शिवसेना अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अन्सार भाई पठाण, महेश पाटील कराळे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना रामहरी राऊत म्हणाले की , महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे फार संवेदनशील मुख्यमंत्री असुन राज्यातील कोणताही गोरगरीब नागरिक रुग्ण हे पैशाअभावी वैद्यकीय उपचाराशिवाय वंचीत राहू नये त्यांना कोणत्याही शासकिय किंवा खाजगी रुग्णालयात किडनी, कॅन्सर, अपघात, फुफ्फुस,यकृत,गुडगे, हृदय रोग आदी आजारांवर मोफत १ लाख रुपयांपर्यंतचा इलाज करता येतो

सदरील योजना निःशुल्क आहे ना वशिला,ना ओळख – थेट मिळते मदत तेव्हा या योजनेचा लाभ सर्व गरजू रुग्णांनी घ्यावा काही अडचण असल्यास कोणत्या रुग्णालया संदर्भात तक्रार असेल कुण्या रुग्णांना अडचण असेल तर मला ८९०७७६००४ व ओम पालकर मंत्रालय मुंबई ८६५७०६१५१५, ओम अकुसकर ८६५७०८१५१५ या कार्यक्रमांवर संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले.

---

# हिंगोली जिल्हा विस्तरीत कार्यकारणी बैठक हिंगोली येथे संपन्न





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । महादेव हरण**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने हिंगोली येथे भारतीय जनता पार्टीची दिनांक ८ ऑगस्ट रोजी हिंगोली येथे बैठक पार पडली, यावेळी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे, प्रदेश उपाध्यक्ष गजाननरावजी घुगे ,माआमदार रामरावजी वडकुते ,जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे ,लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर, महानगराध्यक्ष बाबारावजी बांगर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष पप्पूभाऊ चव्हाण ,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष उज्वलाताई तांबाळे, मिलनजी यबल, मिलिंद देशमुख , अनिताताई सूर्यतळ, कैलास काबरा ,सुभाष लदनिया, सुभाष बोडेवार,पि आर देशमुख, श्रीकांत नाना देशपांडे, शिवदासजी बोडेवार, खोबराजी पाटील, उमेश नागरे यांच्यासह हिंगोली विधानसभा मतदार संघातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते,



---

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । महादेव हरण**

**हिंगोली विधानसभा क्षेत्रातील सेनगाव व हिंगोली परिसरातील मातंग समाजाच्या समस्या जाणून घेत आलेल्या शिष्टमंडळ सोबत रामदास पाटील सुमठाणकर यानी चर्चा केली. हिंगोली येथील प्रलंबित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्याच्या जागेचा हस्तांतरणआणि पूर्णकृती पुतळा उभारणी बाबत शासन स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज स्मारक सारखे परवानगी, जागा हस्तांतरणसाठी सर्व्होतपरी मदत करण्याचे पुतळा समिती सदस्य यांना शब्द दिला. तसेच नुकत्याच स्थापना झालल्या आर्टी अनुषंगाने ही स्थानिक पातळीवर मदत करण्याचेही आश्वासीत केले.यावेळी सेनगाव, हिंगोली भागातील समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते**



---

# मच्छिंद्रनाथ देवस्थान हे भविष्यात जागतिक दर्जाचे होईल–मा.आ.भिमराव धोंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

मच्छिंद्रनाथ देवस्थान हे भविष्यात जागतिक दर्जाचे देवस्थान होईल असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी तालुक्यातील सावरगाव येथे केले. जनसंपर्क अभियाना दरम्यान सावरगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहास धोंडे यांनी भेट त्यावेळी बोलत होते याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष ड.साहेबराव म्हस्के, जि. प. सदस्य सुरेश माळी व इतर उपस्थित होते.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी गुरुवारी दिनांक ८ ऑगस्ट रोजी जनसंपर्क अभियाना अंतर्गत आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, मुळेवाडी, बांदखेल, केळ, पिंपळगाव,हरेवाडी, मराठवाडी, देऊळगाव घाट, शेडाळा, सावरगाव, शेंडगे वाडी या गावाचा दौरा केला. दौऱ्याच्या निमित्ताने माजी आ. भीमराव धोंडे यांचे ठिकठिकाणी वाजतगाजत व तोफा वाजवुन जोरदार स्वागत करण्यात आले. अभियानामध्ये माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आतापर्यंत आष्टी, पाटोदा, कडा, शिरूर, धामणगाव, अंमळनेर , पिंपळवंडी, लोणी सय्यदमीर , पिंपळा, साकत, टाकळसिंग, हिंगणी, खडकत, वाळुंज, पारगाव व परिसरातील गावाचा दौरा केला. गुरूवारी झालेल्या दौऱ्याच्या निमित्ताने जि. प. सदस्य सुरेश माळी, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के,माजी सरपंच नंदू फसले, युवा नेते अभयराजे धोंडे, सरपंच भरत जाधव, देविदास मगर, सिताराम वाणी, अरुण क्षेत्रे, सरपंच शरद दळवी व इतर त्यांच्या सोबत होते. दौऱ्याच्या समारोप प्रसंगी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी मच्छिंद्रनाथ देवस्थान येथे जाऊन दर्शन घेतले.

सावरगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहामधील भाविकांसमोर बोलताना मा. आ. भिमराव धोंडे यांनी सांगितले की, नाथ संप्रदायाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात व देशातील लाखों भाविक पाडव्याच्या दिवशी मच्छिंद्रनाथांच्या दर्शनासाठी येतात. यावेळी ड . साहेबराव म्हस्के यांनी सांगितले की, हभप उंबरेकर महाराजांनी ३९ वर्षापुर्वी हा सप्ताह सुरू केला. पुर्वी गावात सतत भांडणे वाद होत होते. परंतु भिमराव धोंडे आमदार झाले आणि वकील झालो तेव्हा पासून गावातील वाद कमी झाले आहेत. अखंड हरिनाम सप्ताहामुळे लोकांवर चांगले संस्कार होतात व वाद कमी होण्यास मदत होते.

जनसंपर्क अभियानाच्या निमित्ताने पिंपळगाव येथे सिरसाट गल्लीत पेव्हिंग ब्लॉक रस्त्याचे तसेच मराठवाडी येथील दत्त मंदीर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे उद्घाटन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते झाले.

केळ येथील पोलीस दलात निवड झालेल्या चंद्रशेखर कोहोक, वैभव दळवी तसेच देऊळगाव घाट कु. आरती राठोड हीची पोलिस खात्यात चालक म्हणून निवड झाली त्याबद्दल माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दौलावडगांव येथील जागृत देवस्थान हजरत सय्यद नसरुद्दीन शहा दर्ग्याचे दर्शन घेतले तसेच आयडीयल इंग्लिश स्कुलला सदिच्छा भेट दिली. दौला वडगाव ग्रामपंचायत कार्यालयात भेट दिली.भारत इथापे यांनी कर्करोगावर मात केल्याबद्दल त्यांचा भिमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.पिक विम्याबाबत काही शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या. ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा कंपनीकडे नुकसान भरपाईची तक्रार केली अशा बोटावर मोजता येतील इतक्या शेतकऱ्यांनाच पिक विमा कंपनीने नुकसान भरपाई दिली. कंपनीने सरसकट शेतकऱ्यांना पिक विमा नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली.



दौऱ्याच्या निमित्ताने बापु राऊत, शंकरराव कारभळ, बाबासाहेब कारभळ, मोहन पिसोरे, खाजाभाई,भाऊसाहेब दळवी,सुदाम पुंडे, मुकेश घाटविसावे,अरुण क्षेत्रे, एकनाथ दळवी, परशुराम मराठे, माजी सरपंच अशोक माळी, संतोष देशमुख, साहेबराव ठोंबरे, केशव आडसरे, शहादेव भगत, डॉ. वसंत म्हस्के यांच्या निवासस्थानी भेटी दिल्या

दादा कोहोक यांच्या मातोश्रीचे निधन झाले, इस्माईल खान यांचे निधन झाले,

कै.श्रीमती राबोबी शेख यांचे निधन झाले. कै. बबन उत्तम फसले यांचे निधन झाले. हरेवाडी येथील कै.पंढरीनाथ मराठे व दिपक दळवी यांचे निधन झाले. पिंपळगाव येथील गोरख लक्ष्मण दळवी यांचे निधन झाले शेडाळा येथील कै.पांडुरंग लांडगे यांचे निधन झाले, दत्तु बापु शेंडगे यांच्या पत्नीचे निधन झाले या सर्वांच्या कुटुंबीयांचे भिमराव धोंडे यांनी घरी जाऊन सांत्वन केले.

कै.खंडू पिसोरे यांच्या दशक्रिया विधीस उपस्थित राहुन श्रद्धांजली अर्पण केली

जनसंपर्क अभियानात गावागावात सरपंच रामकिशन ठोंबरे, सरपंच भरत जाधव, सरपंच जावेद शेख,माजी सरपंच शेख महेमुद सुल्तान, सरपंच शरद दळवी, ग्रा.पं. सदस्य विठ्ठल फसले,रामदास फसले,ग्रा.पं.सदस्य बद्रिनाथ म्हस्के,मुख्याध्यापक महादेव दानवे, रघुनाथ कोहोक, हारुण मामू, जाधव गुरुजी,परसराम कदम, जैनउददीन मेजर, खंडू इथापे, सदाशिव गव्हाणे,कासम शेख, लिंबराज औटे मेजर, भिवा राऊत,अयुब खान, सिताराम जाधव,अरुण क्षेत्रे, शिवाजी दळवी,महादेव घाटविसावे,विजय शिंदे, देविदास मगर,अतुल जाधव, पोपट जाधव,सिताराम वाणी, रामदास दळवी,राहुल दळवी, मोहन कोहोक,अर्जुन औटे, शंकरराव मराठे,रामदास औटे, पांडुरंग ओटे, खंडू औटे, रावसाहेब दळवी,भाऊसाहेब दळवी,अशोक साधू दळवी, बबनदादा दळवी,श्रीकांत मैंद, विठ्ठल दळवी,तुकाराम दळवी, अजुन ढोले,श्रीकांत रासकर, दत्ता मेहेत्रे,अशोक घाटविसावे, मोहन शिंदे,राजु गिरी,अशोक कोरडे,संभाजी ठोंबरे,राजु राठोड,पोपट शिंदे,बाबासाहेब आडसरे,दिनकर वाघमारे, आडसरे महाराज,दादासाहेब शेंडगे,अशोक शेंडगे,अशोक ठेंगल, मारुती ठेंगल,लहानु ठेंगल,व इतर उपस्थित होते.

## कर्तुत्वान युवा नेतृत्वाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

# महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त भारत सरकार सूक्ष्म,लघु एवं मध्यम मंत्रालय कडुन सह्याद्री रत्न पुरस्कार २०२४ साठी अनिल मोरे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त भारत सरकार,सूक्ष्म,लघु एंव माध्यम उद्यम मंत्रालय असलेल्या सह्याद्री रत्न महाराष्ट्र राज्य मार्फत,समाज,संस्कृती त्यांचे संवर्धन व लोकशाही विचारांना एकत्र करणारा आणि जगण्याला ध्येय बनवणाऱ्या ऐतिहासिक गुणवत्तेचा सर्वश्रेष्ठ सन्मान सोहळा सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळा पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळ्यामध्ये विविध क्षेत्रातील कर्तुत्वान मान्यवरांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे.यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सतत पुरस्कार पैलू युवा उद्योजक सतत समाजसेवा करणारे माननीय श्री अनिल मोरे यांना सुद्धा सह्याद्री रत्न पुरस्कार २०२४ हा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.अनिल मोरे यांना काही दिवसांपूर्वी च राज्यस्तरीय आदर्श कार्यगौरव समाज रत्न पुरस्कार हा पुरस्कार जाहीर झाला आहे,त्या पाठोपाठच सह्याद्रीरत्न पुरस्कार २०२४ हा पुरस्कार साठी निवड करण्यात आली आहे,डॉ.दिपक जाधव यांच्याकडून पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.सह्याद्री रत्न महाराष्ट्र राज्य या समितीने अनिल मोरे यांची निवड पुरस्कारासाठी केली आहे. सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळ्यात साहित्य,कला,सामाजिक, क्रीडा,सांस्कृतिक,उद्योग, पर्यटन,अपंग,निराधार महिला, वन्यजीव,व्यवसाय,शैक्षणिक,आरोग्य सार्वजनिक सेवा,स्वायत्त संस्था सहकार,पत्रकारिता,कृषी अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने उत्तुंग शिखर गाठलेल्या,पैशाला महत्त्व असलेल्या जगात जनसेवेचे व्रत घेतलेल्या व त्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या या सेवेसाठी आपला आयुष्य व्यतित करणाऱ्या सन्मान मूर्तींना विविध क्षेत्रातील विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. उदात्त हेतूने निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या आणि दखल न घेतल्या गेलेल्या अव्यातपणे राबणाऱ्या अदृश्य हातांना सन्मानित करून,पाठीवर कौतुकाची थाप देण्याचे काम पुरस्काराच्या निमित्ताने सह्याद्री रत्न महाराष्ट्र राज्य हे करणार आहे.पुरस्कार सोहळा पुणे येथे पार पडणार आहे अशी माहिती डॉ.दिपक जाधव यांच्याकडून मिळाली आहे.



## प्रा.सुर्यकांत मामडे यांची कन्या श्रध्दा मामडे हिने वैद्यकीय पदव्युत्तर परीक्षेत भारतातून ८० वा क्रमांक पटकावला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

कलंबर येथिल संजय गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुर्यकांत मामडे व जिल्हा परिषद खांबेगाव शाळेच्या सहशिक्षिका उषा मामडे यांची कन्या कु.श्रध्दा सुर्यकांत मामडे हिने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम परिक्षेत संपूर्ण भारत देशातून ८० वा क्रमांक पटकावला आहे.कु.श्रध्दा मामडे हिने लोह्या सारखा ग्रामीण भागात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम नागपूर येथे पुर्ण केला आहे. नांदेड जिल्ह्यातील व लोहा तालुक्यातील श्रध्दा मामडे ही पहिली मानकरी ठरली आहे.श्रध्दा मामडे यांच्या यशाबद्दल समाज उन्नती शिक्षण संस्था कलंबर चे




अध्यक्ष मारोतीराव पाटील घोरबांड , संजय गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कलंबर व बळीराम पाटील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी , विद्यार्थ्यांनी व कलंबर परिसरातील नागरिकांनी श्रध्दा मामडे यांचे कौतुक केले असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अण्णाभाऊ साठे गगनातील विद्वत्तेचा चमकता तारा-प्रा.डॉ.गोपाल बच्छिरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

लोणार नंद्रा ८ अण्णाभाऊ साठे गगनातील विद्वत्तेचा चमकता तारा असे वक्तव्य आपल्या भाषणातून शिवसेना जिल्हा संघटक प्रा.डॉ. गोपाल बछिरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात केले

लोणार नांद्रा येथे गजानन अंभोरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक प्रा. डॉ. गोपाल बछिरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी बोलताना पुढे डॉ.बछीरे



म्हणाले दीड दिवस शाळेत शिकलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन व कार्यावर ३० संशोधक विद्यार्थी पीएचडी डॉक्टरेट डिग्री करत आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतामूलक समाज घडवण्याचा मुलमंत्र अण्णाभाऊ साठे यांनी आत्मसात करून समाजाला एकसंघ करण्याचे मौलिक कार्य केले समाजाने एकसंघ राहावं एकमताने राहावं तरच त्या समाजाची किंमत होते अन्यथा गुच्छ्यातून तुटलेल्या द्राक्षाप्रमाणे माणसाची किंमत मातीमोल होऊ शकते. अनेक दृष्टांत देऊन त्यांनी समाज एकसंघ राहण्याचे मूलमंत्र दिले उद्धव वाणी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला याप्रसंगी प्राचार्य भगवान नागरे, आर.टी. नागरे सर, शिवसेनेचे लोणार शहर उपप्रमुख लुकमान कुरेशी, युवा लोनार शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, डॉ.जाणोजी मानकर, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमास श्रीकांत नरवडे, सरपंच उत्तमराव सानप, उपसरपंच दिनु तनपुरे, नारायण खरात, राजू इंगळे, सुरेश मानवतकर, गजानन सोनवणे, संजू बोदडे, गणेश लोंढे, केशव नरवडे, तुळाजी वाणी, साहेबराव वाणी, विजू सोनवणे, मदन शहाणे, सुमनताई वाणी, आदींसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते या कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी गावातील सर्व समाजाच्या समाज बांधवांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन अंभोरे यांनी केले तर आभार राजूभाऊ अंभोरे यांनी मानले.

## मार्टी ( मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्युट ) स्वायत्त संस्था स्थापनेसाठी पुनर्विचार करण्यास सरकारला भाग पाडले

### सततच्या पाठपुराव्यांतर राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी-प्रा.अमर शेख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

शेख जफर । भोकरदन

अनेक दिवसांपासून मुस्लिम समाजाची मागणी असलेला बहुचर्चित आणि अत्यंत आवश्यक असणारा विद्यार्थि हिताचा प्रश्न म्हणजे मार्टी ( मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्युट ) राज्यभरात माझ्यासह मुस्लिम समाजाच्या रेट्यामुळे राज्य सरकारने ऐरणीवर आणत आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देत निकाली लावला आहे, याबद्दल सरकारचे अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. अमर शेख यांनी व्यक्त केली आहे.पुढे प्रसिद्धीपत्रकात असे म्हटले आहे की, मार्टी संस्थेला मंजुरी मिळण्यासाठी मी



स्वतः अल्पसंख्यांक मंत्री मा. ना. अब्दुल सत्तार साहेब यांच्यासह विभागीय आयुक्त व इतर महत्वाच्या अधिकाऱ्यांची भेट घेत यासंदर्भात मागणी करून हा मुद्दा मुस्लिम समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे पुराव्यासह पटवून दिला होता, तो मान्य झाला आहे,परंतु माझी खरी लढाई निधीसाठी असणार आहे,जर मार्टीला टप्प्या टप्प्याने का होईना परंतु पूरक आणि अधिकचा निधी मिळणे आवश्यक आहे,यामुळे जवळपास दोन लाख विद्यार्थ्यांना याचा उच्च शिक्षणाची फायदा होणार आहे, राज्य सरकारने पहिल्या टप्प्यात कमीत कमी दहा कोटी निधी देण्याची आवशयकता होती,परंतु पुढे निधीसाठी ही पाठपुरावा करणार असल्याचेही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टी पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.अमर शेख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

## विकास वाघमारे यांच्या संकल्पनेतून एक वही एक पेन अभियान अंतर्गत शालेय साहित्य वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

शहरातील वडसावित्री भागात असणाऱ्या नागनाथ निवासी विद्यालयात एक वही एक पेन अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले.

महामानव, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्ताने १४ एप्रिल रोजी पत्रकार विकास वाघमारे व विकास रोडे यांच्या संकल्पनेतून बाबासाहेबांना अपेक्षित एक वही एक पेन या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत जमा झालेले साहित्य आज दिनांक ६ ऑगस्ट रोजी नागनाथ निवासी



विद्यालयात वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संजय खाकरे, संपादक ज्ञानोबा सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते अश्विन मोगरकर, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, पत्रकार धनंजय आढाव, नवनाथ दाने ,पत्रकार संभाजी मुंडे ,धीरज जंगले, विष्णू मुंडे, हरिभाऊ बुरकुले, इंजिनीयर प्रशांत रोडे, विकास चोपडे, विनायक काळे, विद्याधर शिरसाठ आदी उपस्थित होते. याप्रसंगी रानबा गायकवाड, संजय ठाकरे, अनंत इंगळे, अश्विन मोगरकर, विष्णू मुंडे , नवनाथ दाणे आदींनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रानबा गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन इंगळे सर यांनी तर आभार चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास शाळेचे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक होळंबे, प्राथमिकचे डी.बी. मुंडे, तसेच शिक्षक संजय फड, अनंत मुंडे, नागरगोजे ,राजभोज, मोती, कराड, धेरे, हरिदास, शिरसाठ मॅडम, व खाडे मॅडम यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाही विरोधात कानडीघाट शेतकरी आक्रमक नुकसानभरपाईची मागणी, पोलिस फौजफाटा गावात दाखल-डॉ.ढवळे


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावर पेव फुटले असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात आज दि.८ गुरुवार रोजी कानडीघाट येथील शेतकरी आक्रमक झाले असुन त्यांनी टॉवरची तार ओढण्याचे काम बंद पाडले असून अगोदर आम्हाला आमच्या शेतातील टॉवर उभारणी कामाचा तसेच उभ्या पिकातुन तार ओढणीचे काम केल्यास पिकांचे नुकसान होणार असुन अगोदर भरपाई द्या त्यानंतरच तार ओढण्याचे काम करा अशी भूमिका घेतली .पवनचक्की कंपन्यांनी अरेरावीची भाषा करत सुरूवातीला दंडेलशाही पद्धतीने काम रेटण्याचा प्रयत्न केला त्यामुळे शेतकरी आणखीनच आक्रमक झाले. पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पोलिसांना पाचारण केल्यानंतर गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस पाऊस फाटा जमा झाला होता त्यामुळे गावामध्ये काहीकाळ तणावाचे वातावरण होते. अखेर पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी काम न करताच निघून गेले.

गोलंग्री,कानडीघाट,सुलतानपुर या गावांमध्ये ओ २ कंपन्यांचे टॉवर उभारणे आणि तार ओढण्याचे काम सुरू असून शासकीय परीपत्रकाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यासाठी ३५ मीटर रूंदीचा नियम असताना जुने





शासकीय परीपत्रके दाखवून १६ मीटर प्रमाणे नुकसान भरपाई घ्या म्हणतात तसेच याठिकाणी उभारलेल्या २६ टावर उभारण्यात आले असुन प्रत्येकाला नुकसान भरपाईचा मोबदला वेगवेगळा दिलेला आहे. गंभीर बाब म्हणजे या शेतकऱ्यांकडे करारनाम्याची प्रत नाही दिशाभूल करून सह्या घेतलेल्या आहेत.मे मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या शेतात टावरचे काम झाले आहे त्यांना अद्याप मोबदला देण्यात आलेला नाही. एकंदरीतच शेतक-यांच्या अज्ञानाचा गैरफायदा कंपन्यांचे अधिकारी घेत असुन पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी न उभे राहता कंपन्यांच्या बाजुने उभे रहाताना दिसत आहे. असे मत श्रीकांत कवडे यांनी व्यक्त केले.

ओ २ कंपन्यांचे अधिकारी आणि कर्मचारी आमच्या उभ्या पीकातुन विद्युत तार ओढण्यासाठी आलेले असुन उन्हाळ्यात टावर उभारणीचे काम पूर्ण झालेले असताना तेव्हा तार ओढण्याचे काम न करता सध्या आमच्या उभ्या पिकातुन तार ओढण्यासाठी आलेले असुन आमच्या पिकांची नुकसान भरपाई द्यावी किंवा पिक काढल्यावर तार ओढण्याचे काम करण्यात यावे अशी आमची मागणी असुन कंपन्यांचे अधिकारी पोलिस फौजफाटा बोलावून दमबाजी करत तार ओढण्याचा प्रयत्न करत असुन आम्ही ग्रामस्थांनी तो हाणुन पाडला असुन आम्हाला नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय काम करू न देण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. असे विठ्ठल झोडगे यांनी सांगितले.कानडीघाट येथील शेतकरी सुभाष रामभाऊ झोडगे यांना ६ लाख रूपयांचा धनादेश दि.१० जुन २०२४ रोजी दिला होता. सुभाष यांचे वडील रामभाऊ यांना बार्शी येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले असुन उपचारासाठी पैसे काढण्यासाठी धनादेश बँकेत जमा केला असता खात्यावर पैसे नसल्याने वटला नाही.यापुर्वीही दोन वेळा अशा घटना घडलेल्या आहेत.त्यामुळे कंपनीच्या आर्थिक व्यवहार विषयी शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.व्यवहार संशयास्पद असल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत.बालाघाटावर सध्या पवनचक्की प्रकल्प उभरणा-या कंपन्यांचे पेव फुटले असुन परराज्यातील कंपन्या स्थानिक दलालांना हाताशी धरून अशिक्षित शेतकऱ्यांना लालुच दाखवून त्यांची दिशाभूल करून जमिनी ताब्यात घेत असुन पोलिस प्रशासनाच्या बळाचा गैरवापर करत दमदाटी करण्याचा प्रयत्न करत आहेत तसेच राजकीय लोकांचे कार्यकर्ते यांच्या मार्फत दबाव तंत्राचा वापर जमिनी बळकावण्यासाठी करत असल्याच्या तक्रारीत वाढ झाली आहे. राजकीय शक्तींचा वापर करून शेतकऱ्यांना खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतक-यांच्या पाठीशी उभे राहण्याऐवजी आर्थिक लाभापोटी कंपन्यांची पाठराखण करताना दिसुन येत असल्याची खंत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904